महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=================================================================

जावक क्रमांक – ३०५२/४१ दिनांक :- ०९ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा मुंबई मंडळातर्फे २०३० सदनिकांच्या विक्रीकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला प्रारंभ

म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते 'गो लाईव्ह' शुभारंभ

मुंबई, दि. ०९ ऑगस्ट, २०२४ : म्हाडा मुंबई मंडळातर्फे मुंबईतील गोरेगाव पश्चिम, अँटॉप हिल-वडाळा, कोपरी पवई, कन्नमवार नगर-विक्रोळी, शिवधाम कॉम्प्लेक्स-मालाड, दादर, लोअर परळ यांसह विविध भागातील गृहनिर्माण प्रकल्पांमधील विविध उत्पन्न गटातील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित संगणकीय सोडतीकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या शुभहस्ते आज 'गो लाईव्ह' समारंभाद्वारे प्रारंभ करण्यात आला.

म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात श्री. जयस्वाल यांनी नागरिकांना म्हाडाच्या सोडतीमध्ये संगणकीय प्रणालीतूनच अर्ज करण्याचे आवाहन केले. सोडतीच्या कालावधीत अनेक त्रयस्थांकडून घर मिळवून देतो अशा प्रलोभनांना बळी न पडता म्हाडाच्या IHLMS 2.0 (MHADA Integrated Housing Lottery Management System) या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातूनच सोडतीत सहभाग घ्यावा. सोडत प्रक्रियेत नोंदणी करणे, आवश्यक कागदपत्रे सादर करणे, कागदपत्रांची पात्रता पडताळणी करणे, अर्ज करणे ते अनामत रकमेचा भरणा व सोडतीत घर लागल्यावर सदनिकेच्या रकमेचा भरणा करणे या सर्व बाबी या पूर्णतः ऑनलाइन असणार आहेत. अर्जदारांना म्हाडा कार्यालयात देखील यावे लागणार नाही. अशाप्रकारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही प्रणाली मानवी हस्तक्षेपविरहीत आहे. तसेच ही प्रणाली वेळोवेळी स्वयंचलित अद्ययावत होत आहे. नागरिकांना सोडतीत सहभाग घेण्याकरिता नोंदणी प्रक्रिया अमर्याद खुली राहणार आहे. नोंदणी प्रक्रियेनंतर अर्जदाराचे कायम स्वरूपी प्रोफाइल नूतन संगणकीय सोडत प्रणालीमध्ये तयार होणार आहे. अर्जदारांच्या अर्जाची अचूक पडताळणी या प्रणालीद्वारे त्वरित होणार आहे. अर्जदारांची पात्रता सोडतीच्या आधीच निश्चित होणार असून या प्रणालीने पात्र ठरविलेले अर्जदारच सोडतीत सहभाग घेऊ शकतील, अशी माहिती श्री. जयस्वाल यांनी याप्रसंगी दिली. म्हाडाच्या सोडतीसाठी अधिकृत https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर व MHADA Housing Lottery Management System हे एप डाऊनलोड करून त्यावरूनच सोडतीसाठी अर्ज करावा, असे आवाहन श्री. जयस्वाल यांनी केले.

या प्रसंगी श्री. बोरीकर म्हणाले की, सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटासाठी ३५९ सदनिका, अल्प उत्पन्न गटासाठी ६२७ सदनिका, मध्यम उत्पन्न गटासाठी ७६८ सदनिका, उच्च उत्पन्न गटासाठी २७६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या सोडतीत म्हाडाच्या मुंबई मंडळाने बांधलेल्या १३२७ सदनिका, विकास

नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३ (७) व ५८ अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पातून म्हाडाला  विकासकांकडून प्राप्त गृहसाठ्यामध्ये ३७० सदनिका (नवीन व मागील सोडतीतील सदनिका) व मागील सोडतीतील विविध वसाहतीतील विखुरलेल्या ३३३ सदनिकांचा समावेश आहे. या सर्व सदनिका मोक्याच्या ठिकाणी असून त्यांचे दर बाजारभावपेक्षा कमी असून सर्वसामान्यांना परवडणारे आहेत. श्री. बोरीकर यांनी पुढे सांगितले की, ज्या अर्जदारांनी यापूर्वी सोडत प्रक्रियेमध्ये सहभाग घेतला असून कागदपत्रे संगणकीय प्रणालीत अपलोड करून नोंदणी केली आहे, अशा अर्जदारांनी आपल्या त्यावेळच्या प्रोफाइलमध्ये नोंद केल्यानुसार दरम्यानच्या काळात झालेल्या बदलांच्या नोंदी अद्ययावत करावयाच्या आहेत जसे अर्जदार विवाहित असल्यास व पती/ पत्नी यांचे उत्पन्न असल्यास दोघांच्या उत्पन्नाच्या स्त्रोताकरिता पात्र उत्पन्न गटानुसार दोघांचे  दि. ०१/०४/२०२३ ते दि. ३१/०४/२०२४ या कालावधीतील (Assessment Year- 2024-25) आयकर विवरणपत्र अथवा कुटुंबाचा तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला नव्याने अपलोड करावा. अशा अर्जदारानी नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नाही व इतर कागदपत्रे देखील पुन्हा सादर करण्याची गरज नाही, असे श्री. बोरीकर यांनी सांगितले. सोडतीत सहभाग घेण्याकरिता येणाऱ्या  अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी मंडळातर्फे ०२२-६९४६८१०० हा हेल्पलाइन क्रमांक अहोरात्र कार्यरत आहे. त्याचबरोबर अर्जदारांना नवीन संगणकीय प्रणालीची माहिती देणारी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, ध्वनीचित्रफिती आणि हेल्प फाईल या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्यापूर्वी अर्जदारांनी या मार्गदर्शनपर माहिती पुस्तिकेचे अवलोकन करावे, असे आवाहन श्री. बोरीकर यांनी केले आहे.

यावेळी मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य अभियंता-२ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता-३ श्री. शिवकुमार आडे, सहमुख्य अधिकारी श्रीमती वंदना सूर्यवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार श्री. पी. डी. साळुंखे, सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अनिल अंकलगी, विधी सल्लागार श्रीमती मृदुला परब, उपमुख्य अधिकारी (पणन) श्री. राजेंद्र गायकवाड, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले आदी उपस्थित होते.

ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक ०४ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आहे. तसेच ऑनलाईन अनामत रकमेची स्विकृती दिनांक ०४ सप्टेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत केली जाणार आहे. सोडतीसाठी प्राप्त अर्जाची प्रारूप यादी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ऑनलाईन दावे व हरकती दाखल करण्यासाठी दिनांक १० सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिद्धी दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत केली जाणार आहे. प्राप्त अर्जाची संगणकीय सोडत दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता काढण्यात येणार असून सोडतीचे ठिकाण मंडळातर्फे लवकरच जाहीर केले जाईल.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण





मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.
म्हाडा
MHADA
मुंबई मंडळा तर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम, १९८१ आणि म्हाडा (जमिनीची विल्हेवार) नियम १९८१ यामधील तरतूदीनुसार, म्हाडाच्या विविध गृहनिर्माण योजनांतर्गत २०३० सदनिकांच्या विक्रीची जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.
२०३० सदनिकांची
ऑनलाइन अर्ज नोंदणी
GO LIVE
०९ ऑगस्ट २०२४
वेळ दुपारी १२:०० वाजता
मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.ना.श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. ना. श्री. अतुल सावे
गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. सौ. वल्सा नायर सिंह (भा. प्र. से.)
अप्पर मुख्य सचिव गृहनिर्माण विभाग
मा.श्री. संजीव जयस्वाल (भा. प्र. से.)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा
मा. श्री. मिलिंद बोरीकर (भा. प्र. से.)
मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ





म्हाडा
MHADA
म्हाडा मुंबई मंडळाच्या 2030 सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडतीचा


म्हाडा मुंबई मंडळाच्या 2030
सदनिकांच्या विक्रीकरिता
संगणकीय सोडतीचा
म्हाडा
MHADA


MHADA Lottery
https://housing.mhada.gov.in/pre-lottery/select-scheme/1/201/VIEW
473 - ANTOP HILL,WADALA, NOORA BAZAR, NEAR CGS COLONY, WADALA
NOORA BAZAR,NEAR CGS COLONY, ANTOP HILL, ...
474 - KANNAMWAR NAGAR, VIKHROLI, (POCKET-2 BUILDING NO. 4)
KANNAMWAR NAGAR, VIKHROLI. MUMBAI - 83
475 - KANNAMWAR NAGAR, VIKHROLI, (POCKET-1, BUILDING NO. 12B )
KANNAMWAR NAGAR, VIKHROLI, (POCKET-1, BUIL...
476 - SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA COLONY, MALAD (E), MUMBAI
SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA CO...
477 - SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA COLONY, MALAD (E) _48
SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA CO...
478 - SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA COLONY, MALAD (E) _63
SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA CO...
479 - CTS No. 827 (B),Khadakpada, Dindoshi, Malad (E)_43.33
CTS No. 827 (B) S.No. 239 in between "Shivneri CH...
480 - CTS No. 827 (B),Khadakpada, Dindoshi, Malad (E)_59.56
CTS No. 827 (B) S.No. 239 in between "Shivneri CH...
481 - KANNAMWAR NAGAR, VIKHROLI, (POCKET-1, BUILDING NO. 12A ) MUMBAI - 83
KANNAMWAR NAGAR, VIKHROLI, (POCKET-1, BUIL...
482 - CTS NO. 50, PAHADI GOREGAON (W)_73.79
PAHADI GOREGAON, PLOT NO. (A and B) S.NO. 29 ...
483 - CTS NO. 50, PAHADI GOREGAON (W)_72.16
PAHADI GOREGAON, PLOT NO. (A and B) S.NO. 29 ...
484 - CTS NO. 50, PAHADI GOREGAON (W)_72.69
PAHADI GOREGAON, PLOT NO. (A and B) S.NO. 29 ...
485 - CTS NO. 50, PAHADI GOREGAON (W)_72.2
PAHADI GOREGAON, PLOT NO. (A and B) S.NO. 29 ...
486 - SHIVDHAM COMPLEX, OLD DINDOSHI MHADA COLONY, MALAD(E)_MIG
487 - AADI SHANKARACHARY MARG, NEAR RAMBAUG POLICE STATION,KOPARI,POWAI_65.61
Search
12:01
09-08-2024

Outward No. 3052/41 August 9, 2024

# Press Release

## Online Registration and Application Acceptance Process Begins for Sale of 2030 Flats by Mumbai Board

### 'Go Live' Launch by MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal

Mumbai, August 9, 2024: The Mumbai housing and Area Development Board, a unit of MHADA has today initiated the online registration and application acceptance process for the computerized draw of 2030 flats available in various housing projects in Mumbai including Goregaon West, Antop Hill-Wadala, Kopri Powai, Kannamwar Nagar-Vikhroli, Shivdham Complex-Malad, Dadar, and Lower Parel. The 'Go Live' ceremony marking the launch of this process was conducted by MHADA's Vice President and Chief Executive Officer, Mr. Sanjeev Jaiswal.

At a program organized at MHADA's headquarters in Bandra East, Mr. Jaiswal urged citizens to participate in the housing Lottery through the computerized system thereby to avoid falling prey to offers from intermediaries during the draw period. He informed that MHADA's Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) is dedicated to the housing lotteries of its various Bards across the state. The entire process involving registration, submission of necessary documents, verification of the documents, making application, payment of earnest money deposit, and payment of the flat amount upon selection in the housing Lottery will be completely online. Applicants will not need to visit the MHADA office. This system, powered by advanced technology, operates without human intervention and is automatically updated from time to time. The registration process will remain open indefinitely for citizens to participate in the draw. A permanent profile of the applicant will be created in the new computerized draw system after registration and will remain in the system till the applicant wins the house in the lottery. The applicant's application will be verified accurately and immediately by the system. Only applicants deemed eligible by this system will be able to participate in the draw, as

informed by Mr. Jaiswal. He urged applicants to apply for the draw only through the official website https://housing.mhada.gov.in and the MHADA Housing Lottery Management System app.

Speaking on this occasion, Mr. Borikar, chief Officer of the Mumbai Board stated that in the present lottery 359 flats for the Economically Weaker Section (EWS), 627 flats for the Low-Income Group (LIG), 768 flats for the Middle-Income Group (MIG), and 276 flats for the High-Income Group (HIG) are available for sale in this draw. This draw includes 1327 flats constructed by the MHADA Mumbai Board, 370 flats (new and from previous draws) received from developers under Development Control Regulations 33 (5), 33 (7), and 58 redevelopment projects, and 333 scattered flats from various colonies in previous draws. All these flats are located at strategic locations, priced lower than the market rates, and affordable for the general public.

Mr. Borikar further mentioned that applicants who have previously participated in the draw process and uploaded documents in the computerized system, need to update any changes in their profile. If the applicant is married and both spouses have an income, they should upload the income tax return or income certificate from the Tehsildar for the period from April 1, 2023, to March 31, 2024 (Assessment Year 2024-25) according to the eligible income group. These applicants do not need to register again or submit other documents again, as stated by Mr. Borikar. To guide applicants with any difficulties in participating in the draw, the board has set up a 24/7 helpline number 022-69468100. Additionally, a guidance booklet, audio-visual clips, and help files about the new computerized system are made available on the website for applicants. Mr. Borikar advised applicants to review this guidance booklet before participating in the draw process.

Present at the event were Chief Officer of Mumbai Board Mr. Milind Borikar, Chief Officer of Mumbai Building Repairs and Reconstruction Board Mr. Milind Shambharkar, Chief Engineer-2 Mr. Dheerajkumar Pandirkar, Chief Engineer-3 Mr. Shivkumar Ade, Deputy Chief Officer Mrs. Vandana Suryawanshi, Deputy Chief Executive Officer Mr. Anil Wankhade, Chief Architect and Planner Mr. P. D. Salunkhe, Deputy Chief Officer Mr. Umesh Wagh, Chief Officer of Konkan Board Mr. Anil Ankalgi, Legal Advisor Mrs. Mridula Parab, Deputy Chief Officer (Marketing) Mr. Rajendra Gaikwad, Chief Information and Communication Technology Officer Mrs. Savita Bodke, Chief Public Relations Officer Mrs. Vaishali Gadpale, and others.

The last date for submitting online applications is September 4, 2024, at 3:00 PM. While the last date for accepting the earnest Money deposit will be till 11:59 PM on September 4, 2024. The draft list of applications received for the draw will be published by 6:00 PM on September 9, 2024. The deadline for filing online claims and objections from the

publication of the draft list is until 12:00 PM on September 10, 2024. The final list of accepted applications for the draw will be published by 6:00 PM on September 11, 2024. The computerized draw of applications received will be held on September 13, 2024, at 11:00 AM, and the location of the draw will be announced soon by the board.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / Authority

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

जावक नंबर :- ३०५२/४१ दि. ०९ अगस्त, २०२४

**प्रेस विज्ञप्ति**

# म्हाडा मुंबई बोर्ड द्वारा २,०३० फ्लैटों की बिक्री के लिए ऑनलाइन आवेदन प्रक्रिया शुरू

मुंबई, ०९ अगस्त, २०२४: महाराष्ट्र हाउसिंग एंड एरिया डेवलपमेंट अथॉरिटी (म्हाडा) मुंबई बोर्ड ने शहर के विभिन्न आवासीय परियोजनाओं में २,०३० फ्लैटों की बिक्री के लिए ऑनलाइन आवेदन और पंजीकरण प्रक्रिया की आधिकारिक रूप से शुरुआत की है। इस प्रक्रिया को लाइव करने का शुभारंभ म्हाडा के उपाध्यक्ष और मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल के द्वारा किया गया।

ये फ्लैट गोरेगांव पश्चिम, एंटोप हिल-वडाला, पवई, कन्नमवार नगर-विक्रोली, शिवधाम कॉम्प्लेक्स-मालाड, दादर, लोअर परेल और अन्य प्रमुख स्थानों पर स्थित हैं। ये फ्लैट विभिन्न आय वर्गों के लिए उपलब्ध हैं, जिससे नागरिकों के लिए कई विकल्प सुनिश्चित किए गए हैं।

बांद्रा पूर्व स्थित म्हाडा मुख्यालय में आयोजित उद्घाटन समारोह में श्री जयस्वाल ने कहा, "मुझे यह घोषणा करते हुए अत्यंत खुशी हो रही है कि म्हाडा मुंबई बोर्ड ने २०२४ लॉटरी प्रक्रिया का शुभारंभ किया है। यह प्रक्रिया पूरी तरह से पारदर्शी और ऑनलाइन होगी, जिसमें किसी भी प्रकार का मानवीय हस्तक्षेप नहीं होगा। मैं सभी नागरिकों से अनुरोध करता हूँ कि वे केवल म्हाडा की आधिकारिक ऑनलाइन प्रणाली, जिसे IHLMS २.० कहा जाता है, के माध्यम से ही आवेदन करें। मैं नागरिकों को सावधान करना चाहता हूँ कि वे किसी भी तृतीय पक्ष के झांसे में न आएं जो फ्लैट दिलाने का दावा करते हैं।"

मुंबई बोर्ड के अध्यक्ष श्री बोरीकर ने कहा, "आज मुंबई मंडल की ओर से २,०३० फ्लैटों के लिए लॉटरी प्रक्रिया की घोषणा करते हुए मुझे बेहद गर्व हो रहा है। हमने इस बार भी वही तकनीक अपनाई है जो पिछले वर्ष सफलतापूर्वक इस्तेमाल की गई थी। यह फ्लैट विभिन्न आर्थिक वर्गों के लिए हैं, और हम उम्मीद करते हैं कि इस बार भी हमें सकारात्मक प्रतिक्रिया मिलेगी। मैं सभी आवेदकों से आग्रह करता हूँ कि वे इस लॉटरी का लाभ उठाएं और अपने सपनों का घर प्राप्त करें।"

फ्लैटों का वितरण:
- आर्थिक रूप से कमजोर वर्ग (EWS): ३५९ फ्लैट
- निम्न आय वर्ग (LIG): ६२७ फ्लैट
- मध्यम आय वर्ग (MIG): ७६८ फ्लैट
- उच्च आय वर्ग (HIG): २७६ फ्लैट

कुल २,०३० फ्लैटों में म्हाडा द्वारा नए निर्मित १,३२७ फ्लैट, विकास नियंत्रण विनियम (DCR) ३३(५), ३३(७), और ५८ के तहत पुनर्विकास परियोजनाओं से ३७० फ्लैट, और पिछली लॉटरी से पुनः उपलब्ध कराए गए ३३३ फ्लैट शामिल हैं। ये सभी फ्लैट प्रमुख स्थानों पर स्थित हैं और बाजार दर से कम कीमत पर उपलब्ध हैं, जिससे वे आम जनता के लिए सुलभ हैं।

जिन आवेदकों ने पहले म्हाडा लॉटरी में पंजीकरण किया है और अपने दस्तावेज़ अपलोड किए हैं, उन्हें केवल अपने प्रोफाइल में बदलाव जैसे आय या वैवाहिक स्थिति को अपडेट करना होगा। उन्हें फिर से पंजीकरण करने या दस्तावेज़ पुनः जमा करने की आवश्यकता नहीं है।

आवेदकों की सहायता के लिए २४/७ हेल्पलाइन (०२२-६९४६८१००) शुरू की गई है और मार्गदर्शन सामग्री, वीडियो और सहायता फाइलें आधिकारिक वेबसाइट पर उपलब्ध कराई गई हैं। आवेदन करने से पहले आवेदकों से वेबसाइट पर दी गई जानकारी की समीक्षा करने का अनुरोध किया गया है।

महत्वपूर्ण तिथियाँ:
- ऑनलाइन आवेदन की अंतिम तिथि: ०४ सितंबर, २०२४, दोपहर ३:०० बजे तक
- जमा राशि भुगतान की अंतिम तिथि: ०४ सितंबर, २०२४, रात ११:५९ बजे तक
- प्रारंभिक आवेदकों की सूची: ०९ सितंबर, २०२४, शाम ६:०० बजे तक
- आपत्तियाँ दाखिल करने की अंतिम तिथि: १० सितंबर, २०२४, दोपहर १२:०० बजे तक
- अंतिम आवेदकों की सूची: ११ सितंबर, २०२४, शाम ६:०० बजे तक
- लॉटरी ड्रॉ की तिथि: १३ सितंबर, २०२४, सुबह ११:०० बजे

लॉटरी ड्रॉ के स्थल की घोषणा शीघ्र ही की जाएगी।

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण